Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near
Balchitrawani, Bhind Agharkar Research Institute,
Bhamburda, Shivajinagar, Pune411004 (INDIA)

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.नं.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९, बालचित्रवाणी शेजारी,
आघारकर रिसर्च इन्सिस्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४ (भारत)

Telephone No. EPABX - 25705000, Chairman (P) - 25651751, Secretary (P) - 25651750

तात्काळ/महत्त्वाचे

क्रमांक रा.मं./परीक्षा-२/४७०४
पुणे ४११ ००४
दिनांक - २३ जुलै २००९

प्रति,

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३२
२) मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक, पुणे/ नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती नाशिक/लातूर
३) मा. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई - ४०० ०३०
४) मा. संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र, नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई - ४०० ०२०
५) मा. संचालक, आकाशवाणी केंद्र, पुणे/नागपूर/औरंगाबाद/जळगांव/रत्नागिरी/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक केंद्र
६) सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी
७) मा. वृत्तपत्र संपादक

विषय : इ. १० वी ची परीक्षा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इ. ११ वी प्रवेशासाठी ए.टी.के.टी.ची (Allowed to keep terms) सवलत लागू करणेबाबत.

महोदय,

फेब्रुवारी/मार्च २००९ मध्ये घेण्यात आलेल्या इ. १० वी ची परीक्षा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये याकरिता सदर परीक्षेत कमाल २ विषयात अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षात इयत्ता ११ मध्ये प्रवेश देण्यासाठी ए.टी.के.टी.ची सवलत देण्याबाबत शासन स्तरावरुन मान्यता देण्यात आली असून त्याबाबतच्या प्रकटनाची प्रत सोबत जोडली आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्रातून आणि आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी प्रादेशिक बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

सचिव,
राज्य मंडळ, पुणे - ४

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी -

(१) विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर विभागीय मंडळ,
पुणे/ नागपूर/ औरंगाबाद/ मुंबई/ कोल्हापूर / अमरावती/ नाशिक /लातूर त्यांनी स्थानिक स्तरावर प्रकटन प्रसिध्द करावे व सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.
(२) व्यवस्थापक गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे (३) अस्वीस, राज्य मंडळ (४) ग्रंथालय
(५) टेलिफोन ऑपरेटर (६) ऑन लाईन शाखा

प्रत माहितीसाठी सविनय सादर -

१) मा. खाजगी सचिव, मा.ना. शालेय शिक्षण राज्यमंत्री, मंत्रालय, मुंबई -४०००३२
२) मा. खाजगी सचिव, मा. ना. शालेय शिक्षण मंत्री , मंत्रालय, मुंबई- ४०००३२
३) मा. सचिव, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०००३२

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

## प्रकटन

**विषय : इयत्ता १० वी ची परीक्षा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी प्रवेशासाठी ए.टी.के.टी.ची (Allowed to Keep Terms) सवलत लागू करण्याबाबत...**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने पुणे /नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर या आठ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक परीक्षेतील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जावू नये म्हणून पुरवणी परीक्षेची मागणी समाजातून करण्यात आली. तथापि पुरवणी परीक्षेचे आयोजन करण्यास यावर्षी मोठ्या प्रमाणावर अडचणी असल्यामुळे पुरवणी परीक्षेस पर्याय म्हणून विद्यापीठाचे धर्तीवर फेब्रुवारी-मार्च २००९ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १० वी) अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याचे शैक्षणिक वर्ष वाया जावू नये याकरीता सदर परीक्षेत कमाल दोन विषयांत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षात इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश देण्यासाठी (ए.टी.के.टी.सवलत) खालील अटींचे अधीन राहून शासनाने दिनांक २० जुलै २००९ चे आदेशान्वये मान्यता दिली आहे.

(१) ए.टी.के.टी.ची सवलत मार्च २००९ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) च्या परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक वर्ष २००९-२०१० मध्ये इयत्ता ११ वी च्या प्रवेशासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परीक्षेत कमाल दोन विषयात अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठीच लागू राहील.

(२) विज्ञान शाखेच्या प्रवेशासाठी ए.टी.के.टी.ची सवलत घेणाऱ्या विद्यार्थ्यांस विज्ञान विषयात किमान ४०% गुण असणे आवश्यक राहील.

(३) ए.टी.के.टी. सवलतीमुळे इयत्ता ११ वीमध्ये मिळणारा प्रवेश हा तात्पुरता स्वरुपाचा असेल. त्या विद्यार्थ्यांस इयत्ता ११ वीच्या वर्षात शिकत असताना ए.टी.के.टी.मिळालेला विषय घेवून ऑक्टोबर २००९ मध्ये आयोजित मंडळाच्या परीक्षेस बसणे अनिवार्य राहील. या मधेही अनुत्तीर्ण झाल्यास मार्च २०१० च्या परीक्षे मधील संधी अंतीम राहील. अंतिम संधी मध्ये देखील ए.टी.के.टी. प्राप्त विषयामध्ये विद्यार्थी उत्तीर्ण न झाल्यास त्याला देण्यात आलेला इयत्ता ११ वीचा प्रवेश रद्द करण्यात येईल. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचे ए.टी.के.टी.विषय उत्तीर्ण होई पर्यंत इयत्ता ११ वीचा निकाल जाहिर केला जाणार नाही व गुणपत्रिका दिली जाणार नाही तसेच इयत्ता १२ वी च्या प्रवेशासाठी तो पात्र राहणार नाही.

(४) जे विद्यार्थी मार्च २००९ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस (इयत्ता १० वी) सर्व विषय (श्रेणी विषयाव्यतिरिक्त) एकाच वेळी घेवून प्रविष्ठ झालेले आहेत(श्रेणी सुधार योजना व्यतिरिक्त) त्यानांच ए.टी.के.टी. ची सवलत लागू राहील.

(५) विद्यार्थ्यास ए.टी.के.टी. ची सवलत घेण्याचा अथवा नाकारण्याचा विकल्प राहील.

(६) ए.टी.के.टी. सवलत प्राप्त विद्यार्थ्यांना ऑक्टोबर २००९ अथवा मार्च २०१० मध्ये अनुत्तीर्ण विषयाची (एक किंवा दोन) फक्त लेखी परीक्षा द्यावी लागेल आणि त्याचे त्या विषयातील प्रात्यक्षिक/मौखिक /अंतर्गत मूल्यमापनाचे पूर्वीचे गुण ग्राह्य धरण्यात येतील.

सचिव
राज्य मंडळ, पुणे

पुणे - ४११ ००४
दिनांक - २३ जुलै २००९
rajshri.Exam-6 /20